फोन नं.०२२६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व), मुंबई ५१.

जा. क्र. ४/विकामुं/तंशि/शिष्यवृत्ती/२०२६/ ३८८ दि. ३१ ऑक्टोबर २०२६

## परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यन्वित महाडीबीटी पोर्टल २.० वरील संस्थेची माहिती अद्ययावत करुन प्रवर्ग निहाय व मुले-मुली निहाय विभाजित झालेल्या योजनांनुसार अर्ज भरुन घेण्याबाबत....

संदर्भ: १. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डिबीटी/विकाप/२०२६-२७/५८५ दि.१९.१०.२०२६

२. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डिबीटी/विकाप/२०२६-२७/५९६ दि.२६.१०.२०२६

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून महाडीबीटी १.० पोर्टलव्दारे राबविण्यात येत असलेल्या योजना विभाजित करण्यात आलेल्या असल्याबाबत कळविलेले आहे. तसेच विभाजित झालेल्या योजनांनुसार, संबंधित योजनांतर्गत नवीन / नुतनीकरणाचे अर्जांसाठी लागू प्रवर्ग व मुलांमुलींचा तपशील कळविलेला आहे. सदर योजनांबाबतची संक्षिप्त माहिती सोबत जोडण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टल कार्यन्वित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थांना पुन: श्च सूचित करण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी तसेच विदयार्थ्यांना प्रवर्गनिहाय व मुलांमुलींनिहाय शासनाच्या लागू असलेल्या योजनाबाबत अवगत करावे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी, महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टल कार्यन्वित करण्यात आल्याबाबत कळविलेले आहे, सदर पोर्टल वर नोंदणीकृत असणा-या संस्थांना, संस्थेची माहिती अद्ययावत करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. सदर सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच डीबीटी पोर्टलवर शुल्क निश्चित/मंजूर करुन घेतलेले शुल्क दुरुस्ती करण्याबाबतची कोणतीही विनंती संचालनालयामार्फत मान्य करण्यात येणार नाही व या कार्यालयामार्फत त्याबाबत शिफारस करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सोबत: संदर्भीय पत्र

(डॉ. मारुती रा. जाधव)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय/अनुदानित व खाजगी विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था
प्रत: मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई - यांना माहितीकरीता (कार्यासन क्र.१८)

D:\Sayali\new letter.doc

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४८६ / ४८७

ई-मेल- desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

<u>तात्काळ : स्पीडपोस्ट / ई-मेलद्वारे</u>

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/५८५
दि:- १८/१०/२०२६

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे.

विषय :- - शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून कार्यान्वित महाडीबीटी पोर्टल २.० तसेच प्रवर्ग निहाय व मुले-मुली निहाय विभाजित झालेल्या योजनां नुसार अर्ज भरुन घेण्याबाबत...

संदर्भ :-१.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३,दि.२३/०४/२०२६(विभा.प्रलंबित अर्ज)
२.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४११,दि.१७/०७/२६ ( DBT२.०-सुरु)
३. संचालनालयाचे पत्रक्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/४४४,दि.०४/०८/२६(लागू योजनानुसार अंमलबजावणीबाबत )

या संचालनालयाचे संदर्भीय पत्रान्वये शै.वर्ष २०२६-२७ पासून, आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) विद्यार्थ्यांसाठी शै.वर्ष २०२५-२६ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी १.० पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण ) " व "डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ( तंत्रशिक्षण )" योजना खालीलप्रमाणे विभाजित करण्यात आलेल्या आहेत , असे कळविण्यात आलेले आहे.

अ ) "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण ) " ही एक योजना, प्रवर्गनिहाय व मुले-मुली निहाय खालीलप्रमाणे तीन योजनामध्ये विभाजित करण्यात आली आहे.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण )
२) मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना ( तंत्रशिक्षण )
३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )

ब ) "डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना (तंत्रशिक्षण)" ही एक योजना प्रवर्गनिहाय निहाय खालीलप्रमाणे दोन योजनांमध्ये विभाजित करण्यात आली आहे.

१) डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ( तंत्रशिक्षण )
२) डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )

तरी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विभाजित झालेल्या योजनांनुसार, संबंधित योजनांतर्गत नवीन / नुतनीकरणाचे अर्जासाठी लागू प्रवर्ग व मुलां-मुलीं चा तपशील खालीलप्रमाणे -

| अनु.क्र. | योजनेचे नाव | प्रवर्ग | लिंग |
|---|---|---|---|
| १. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (तंत्रशिक्षण) | १.खुला (ईबीसी/ईडब्ल्युएस) आणि २.अभिमत विद्यापीठांतील [खुला (ईबीसी/ईडब्ल्युएस) व एसईबीसी] | १.मुले आणि २.अभिमत विद्यापीठांतील मुले/मुली |
| २. | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी (तंत्रशिक्षण) | एसईबीसी | मुले/मुली |
| ३. | मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना (तंत्रशिक्षण) | खुला (ईबीसी/ईडब्ल्युएस) | मुली |
| ४. | डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना (तंत्रशिक्षण) | खुला (ईबीसी/ईडब्ल्युएस) | मुले/मुली |
| ५. | डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना -एसईबीसी (तंत्रशिक्षण) | एसईबीसी | मुले/मुली |

शै.वर्ष २०२६-२७ पासून, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वरील तक्त्यातील ५ योजनांची तसेच अल्पसंख्यांक विकास विभागाच्या - उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनाबाबतची संक्षिप्त माहिती सोबत जोडण्यात आलेली आहे.- प्रपत्र-१

तरी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी, महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टल (संकेतस्थळ- https://mahadbt2.maharashtra.gov.in) कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालयांना पुन:श्च सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांना व अभिमत विद्यापीठांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच, संस्थांच्या प्राचार्यासोबत बैठक घेऊन विद्यार्थ्यांना प्रवर्गनिहाय व मुलां-मुलींनिहाय शासनाच्या लागू असलेल्या योजनाबाबत अवगत करावे.

१. संस्थांनी प्रवर्गनिहाय व मुलां-मुलींनिहाय उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी तसेच, संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व योजनेसाठी नवीन / नुतनीकरण अर्जासाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून द्यावी व विद्यार्थ्यांना त्या त्या संबंधित योजनांसाठी नवीन / नुतनीकरणाचे अर्ज महाडीबीटी २.० पोर्टलवर उपलब्ध असलेल्या मॅन्युअलचा वापर करुन तात्काळ भरण्याबाबत कळविण्यात यावे.
२. संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरांवर विशेष मोहिम राबवून, प्रवर्गनिहाय व मुलां-मुलींनिहाय लागू असलेली त्या त्या संबंधित योजनांसाठी नवीन / नुतनीकरणाचे अर्ज भरून घ्यावेत. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.
३. सर्व संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची, शासनाची शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

(डॉ. प्रमोद अ.नाईक.)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत. १) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.
२) मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.

❖ तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती -२०२६-२७

## १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना- खुला प्रवर्ग (EBC/ EWS) :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या** आर्थिकदृष्टया मागास (EBC) आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक **(EWS) मुलांसाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** ( Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Yojna ) लागू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता कुटुंबाचे **वार्षिक उत्पन्न** (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत निश्चित करण्यात आलेले आहे.

तसेच, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. २३ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील अभिमत विद्यापीठामध्ये शिक्षण घेणाऱ्या (EBC/EWS/SEBC) मुलां-मुलींना सदर योजनेचा एक ठराविक लाभ लागू करण्यात आलेला आहे.

- शिष्यवृत्ती रक्कम -

सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या लाभ विद्यार्थ्यांना** खालील प्रमाणे देण्यात येतो.

| अ. क्र. | प्रवर्ग | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | विद्यार्थी | शैक्षणिक शुल्काच्या | परीक्षा शुल्काच्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | (EBC/EWS) | ८ लाखा पर्यंत | व्यावसायिक | मुले | ५० टक्के | ५० टक्के |
| २ | (EBC / EWS /SEBC) | ८ लाखा पर्यंत | व्यावसायिक | अभिमत विद्यापीठातील मुले-मुली | एक ठराविक लाभ | |

सदर योजनांची मंजुर रक्कम दोन हप्त्यांमध्ये,विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये)/ संस्थाना डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **महाडिबीटी पोर्टल** (URL - https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

## २. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी ( तंत्रशिक्षण ) :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) **मुले / मुलीसाठी "राजर्षी छत्रपती** शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )" ( Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Tuition Fee Scholarship -SEBC -Technical Education ) लागू करण्यात आली आहे.

- शिष्यवृत्ती रक्कम -

सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या लाभ** मुले / मुलींना खालील प्रमाणे देण्यात येतो.

| अ. क्र. | प्रवर्ग | अभ्यासक्रम | विद्यार्थी | शैक्षणिक शुल्काच्या | परीक्षा शुल्काच्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | SEBC | व्यावसायिक | मुले | ५० टक्के | ५० टक्के |
| २. | | | मुली | १०० टक्के | १०० टक्के |

सदर योजनांची मंजुर रक्कम दोन हप्त्यांमध्ये,विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये)/ संस्थाना डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- **वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-**

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या **महाडिबीटी पोर्टल** (URL - https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

३. मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना ( तंत्रशिक्षण ) :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये / तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) मुलींसाठी "मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना ( तंत्रशिक्षण )" ( Free Professional Education Scheme for Girls - Technical Education ) लागू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत निश्चित करण्यात आलेले आहे.

- शिष्यवृत्ती रक्कम -.वर्ष २०२४-२५ पासून लाभाची रक्कम खालील प्रमाणे-

सदर योजनेंतर्गत विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या लाभ मुलींना खालील प्रमाणे देण्यात येतो.

| अ. क्र. | प्रवर्ग | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | विद्यार्थी | शैक्षणिक शुल्काच्या | परीक्षा शुल्काच्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | (EBC/EWS) | ८ लाखा पर्यंत | व्यावसायिक | मुली | १०० टक्के | १०० टक्के |

सदर योजनांची मंजुर रक्कम दोन हप्त्यांमध्ये,विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये)/ संस्थाना डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या महाडिबीटी पोर्टल (URL - https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

४. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना -खुला प्रवर्ग (EBC/ EWS) :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ( व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरांवरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या ज्या आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" ( Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna ) लागू केली आहे.

- योजनेच्या लाभासाठीचा संच ( Quota ) -

| संच (Quota)- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना"-खुला प्रवर्ग- (EBC/ EWS) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | प्रकार | राज्याच्या प्रत्येक जिल्हया-साठीचा संच (Quota) |
| १. | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | सर्व पात्र विद्यार्थी |
| २. | ज्या विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - १ लाखा पर्यंत आहे. | सर्व पात्र विद्यार्थी |
| ३. | ज्या विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न -१ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत आहे. | ५०० पर्यंत मर्यादित संच ( खुला प्रवर्ग आणि एस.ई.बी.सी. प्रवर्ग ) -(३३ टक्के महिलां-करिता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्ते नुसार ) |

- रक्कम :- शै.वर्ष २०२३-२४ पासून लाभाची रक्कम खालील प्रमाणे-

| शै.वर्षातील दहा महिना करिता- एकूण लाभाची रक्कम ( रुपयांत ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | भत्ता | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरांत उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर महसुली विभागीय शहरांतील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्हयांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. |
| १. | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २. | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३. | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | एकूण रक्कम | ६०,०००/- | ५१,०००/- | ४३,०००/- | ३८,०००/- |

सदर योजनेतंर्गत, वास्तव्याच्या एकूण कालावधीनुसार ( जास्तीत जास्त दहा महिना करिता ) मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या महाडिबीटी पोर्टल (URL - https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल** व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

६. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना ( भाग - १ वैद्यकिय अभ्यासक्रम वगळून ) - ( तंत्रशिक्षण ) :-

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन आणि ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गुणवत्ताधारक व तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण ( पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ) घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता **"उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना"** लागू करण्यात आली आहे. सदर योजनेकरीता कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (दोन्ही पालकांचे एकत्रित) रुपये ८.०० लाखा पर्यंत निश्चित करण्यात आलेले आहे. सदर योजनेकरीता विदयार्थ्यांने माध्यमिक शालांत परिक्षा ( एस एस सी ) महाराष्ट्र राज्यातुन उत्तीर्ण केलेली असावी.

- रक्कम - शै.वर्ष २०२२-२३ पासून लाभाची रक्कम खालील प्रमाणे-

सदर योजनेंतर्गत नविन शिष्यवृत्ती व नूतनीकरणासाठी आलेल्या पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थी ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असेल, त्या अभ्यासक्रमाकरिता खालील प्रमाणे **शिष्यवृत्तीची रक्कम** देण्यात येते.

| अ.क्र. | प्रकार | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | अभ्यासक्रम | विद्यार्थी | शिष्यवृत्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिष्यवृत्ती | ८ लाखा पर्यंत | व्यावसायिक | मुले | प्रत्यक्ष वार्षिक शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| २ | | | | मुली | |

सदर योजनांची मंजुर रक्कम दोन हप्त्यांमध्ये,विद्यार्थ्यांना (त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या महाडिबीटी पोर्टल (URL – https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

५. डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना -एसईबीसी ( तंत्रशिक्षण ) :-

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय, शासन अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ शासकीय विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठे वगळून ) मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे ( व्यवस्थापन कोटयातील / संस्था स्तरांवरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणा-या ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) विद्यार्थ्यांचे पालक अल्प-भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना- एसईबीसी " ( Dr.Panjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna-SEBC-Technical Education ) लागू केली आहे.

- योजनेच्या लाभासाठीचा संच ( Quota )-

| संच ( Quota )- डॉ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना- एसईबीसी ( तंत्रशिक्षण ) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | प्रकार | राज्याच्या प्रत्येक जिल्हया-साठीचा संच (Quota) |
| १. | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | सर्व पात्र विद्यार्थी |
| २. | ज्या विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - १ लाखा पर्यंत आहे. | सर्व पात्र विद्यार्थी |
| ३. | ज्या विद्यार्थ्यांचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न -१ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत आहे. | ५०० पर्यंत मर्यादित संच ( खुला प्रवर्ग आणि एस.ई.बी.सी. प्रवर्ग ) -(३३ टक्के महिलां-करिता राखीव व अभ्यासक्रम निहाय गुणवत्ते नुसार ) |

- रक्कम :- शै.वर्ष २०२३-२४ पासून लाभाची रक्कम खालील प्रमाणे-

| शै.वर्षातील दहा महिना करिता- एकूण लाभाची रक्कम ( रुपयांत ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | भत्ता | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरांत उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर महसुली विभागीय शहरांतील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्हयांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. |
| १. | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २. | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३. | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | एकूण रक्कम | ६०,०००/- | ५१,०००/- | ४३,०००/- | ३८,०००/- |

सदर योजनेतंर्गत, वास्तव्याच्या एकूण कालावधीनुसार ( जास्तीत जास्त दहा महिना करिता ) मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे जमा करण्यात येते.

- वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाच्या महाडिबीटी पोर्टल (URL - https://mahadbt२.maharashtra.gov.in) वर देण्यात आलेल्या युजर मॅन्युअल व सुचनांचे पालन करुन, डिबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावे.

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४८६ / ४८७

ई-मेल- desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

तात्काळ : स्पीडपोस्ट/ई-मेलद्वारे

क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/ ५०६

दि:-२६ /१० /२०२६

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे.

विषय:- शै. वर्ष २०२६-२७ करिता संस्थांनी महाडीबीटी पोर्टल २.० वरील संस्थेची माहिती ( Institute Profile ) अद्ययावत करण्याबाबत ....

संदर्भ:-१.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३,दि.२३/०४/२०२६(विभा.प्रलंबित अर्ज)

२.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४११,दि.१७/०७/२६ ( DBT२.०-सुरु)

३. संचालनालयाचे पत्रक्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/४४४,दि.०४/०८/२६(योजनाची अंमलबजावणीबाबत )

४.संचालनालयाचे पत्रक्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४७२,दि.३१/०८/२६ (DBT 2.0-Login credentials)

५.संचालनालयाचे पत्रक्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/५८५,दि.१९/१०/२६ ( योजनानिहाय अर्ज भरणे )

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी, महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टल (संकेतस्थळ- https://mahadbt2.maharashtra.gov.in) कार्यन्वित करण्यात आल्याबाबत संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले असून तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत खालील योजना ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात.

अ) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या-

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना ( तंत्रशिक्षण )
२. मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना ( तंत्रशिक्षण )
३. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )
४. डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना (तंत्रशिक्षण)
५. डॉ पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना -एसईबीसी ( तंत्रशिक्षण )

ब) अल्पसंख्यांक विकास विभागाची-

१. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता, महाडीबीटी २.० पोर्टल वर नोंदणीकृत असणाऱ्या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्यासाठी सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना खालीलप्रमाणे न चुकता सूचित करावे.

१. संस्थांनी, डीबीटी पोर्टलचा प्राचार्यांचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्था माहिती (Institute Profile) अंतर्गत दिलेल्या सूचनानुसार, संस्थेची माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रमाचा तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.

२. संस्थांनी, सदर माहिती सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले, विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. [ तसेच, शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित (Fees Not Approved) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.]

३. डीबीटी पोर्टलवर **संस्था प्रमुख/प्राचार्य यांचेकडून** भरण्यात आलेले व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले वर्षनिहाय **शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आले तर ते दुरुस्त करता येणार नाही** व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ त्या शै. वर्षामध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी, प्रत्येक शै.वर्षासाठी लागू असतो, या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क **अचूक भरुन** मंजूरीसाठी पाठवावे याची संस्था प्रमुख / प्राचार्यांनी स्वत: नोंद घ्यावी तसेच,

४. जर, संस्थेने शैक्षणिक शुल्क वाढीबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे जमा केलेला असेल तर त्या संस्थेने जोपर्यंत शुल्क वाढीबाबतचा निर्णय होत नाही तोपर्यंत संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्या डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन **डीबीटी पोर्टलवर शुल्क** भरुन मंजूरीसाठी सादर करु नये. संस्थेच्या प्राचार्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक शुल्क वाढीबाबतचा प्रस्तावाच्या निर्णयाआधी **डीबीटी पोर्टलवर शुल्क मंजूर करुन घेतल्यास** आणि नंतर वाढीव **शुल्कानुसार** शिष्यवृत्तीची मागणी केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही याची संस्था प्रमुख / प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

५. जर, संस्थेने शैक्षणिक **शुल्क वाढीबाबतचा** प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे जमा केलेला असेल आणि तो मान्य करुन शुल्क वाढीची परवानगी सक्षम प्राधिकरणाकडून देण्यात आली असेल व शुल्क वाढीबाबतचा निर्णयाआधी संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन, **डीबीटी पोर्टलवर पुर्वीचे शुल्क भरुन मंजूरी घेतली असेल तर योजनेच्या लाभामध्ये होणाऱ्या नुकसानाची जबाबदारी देखील संस्थेची राहील याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

तसेच, वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना दिल्यानंतरही, असे आढळून आले की, काही संस्थांनी गतवर्षी डीबीटी पोर्टलवर शुल्क निश्चित/ मंजूर करुन घेतले व त्याप्रमाणे विद्यार्थी / संस्थांना लाभ सुध्दा प्राप्त झाला व तद्नतंर FRA कडून संस्थेच्या सुधारित ( Revised ) शुल्काच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्याने, संस्थाकडून डीबीटी पोर्टलवर सुधारित शुल्कानुसार आधीच मंजूर करुन घेतलेले शुल्क दुरुस्त ( Edit ) करण्याकरिता संचालनालयास वारंवार विनंती करण्यात आली, तसेच काही सहसंचालक, विभागीय कार्यालयांनी सुध्दा याबाबत शिफारस केलेली आहे. तरी, याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात येत आहे की, वरील प्रकारची कोणतीही विनंती संचालनालयामार्फत मान्य करण्यात येणार नाही व सहसंचालक विभागीय कार्यालय यांनी याबाबत शिफारशी देऊ नये.

( डॉ. प्रमोद अं. नाईक. )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई.

प्रत, १) मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.
२) मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.
३) मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, आलियावर जंग मार्ग,वांद्रे ( पूर्व ), मुंबई- ४०० ०५१ यांना विनंती करण्यात येते की, डीबीटी वर्क फ्लोनुसार संस्थांच्या डीबीटी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरुन संस्थांना विद्यार्थ्यांच्या अर्जावरील पुढील कार्यवाही करता येईल.